महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**क्र. पीआर-३/कृषी संजीवनी-२०१४/४०१२७** **दिनांक :२४.११.२०१५**

# वाणिज्य परिपत्रक क्र. २५१

**विषय :- कृषी ग्राहकांकडील वीज बिल थकबाकीमध्ये सवलत देण्यासाठी "कृषी संजीवनी योजना-२०१४" ला दि.३१.०३.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.**

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१४८/ऊर्जा-५ दि.१९.०६.२०१४.
२) वाणिज्य परिपत्रक क्र.२२३ दि.२०.०६.२०१४.
३) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१४८(१)/ऊर्जा-५ दि.१७.११.२०१५.

महावितरण कंपनीच्या कृषी ग्राहकांना मदत करण्याच्या दृष्टीने व त्यांच्याकडील वीज देयकांच्या थकीत रक्कमेचा भार कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये "कृषी संजीवनी योजना-२०१४" हि योजना राबविण्यात आलेली होती. सुरुवातीला सदर योजना दि. ३१.०८.२०१४ पर्यंत राबविण्यात आली होती. त्यानंतर या योजनेस दि.३१.१०.२०१४ व दि.३१.०३.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

शासनाने संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार "कृषी संजीवनी योजना-२०१४" ला दि.३१.०३.२०१६ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सदर मुदतवाढीमुळे योजनेमध्ये पात्र होण्यासाठी कृषी ग्राहकांना दि.३१.०३.२०१४ च्या मुळ थकबाकी रक्कमेच्या ५०% मुळ थकीत रक्कम दि.३१.०३.२०१६ पर्यंत भरल्यास उर्वरित ५० % मुळ थकीत रक्कम महाराष्ट्र शासनातर्फे महावितरणला अनुदान स्वरुपात देय राहणार आहे. तसेच या योजनेमध्ये भाग घेणा-या कृषी ग्राहकांचे दि.३१.०३.२०१४ रोजी थकीत असलेले पूर्ण व्याज व दंड हे महावितरण कंपनीतर्फे माफ करण्यात येणार आहे. तथापि, १ एप्रिल २०१४ नंतर वितरीत करण्यात आलेल्या चालू वीज देयकांचा भरणा करणे, योजनेत सहभागी होणा-या कृषी ग्राहकांना क्रमप्राप्त आहे.

कृषी ग्राहकांना वीज बिल भरण्यासंबंधी सुलभ हप्ते आवश्यक असल्यास ग्राहकांच्या विनंतीनुसार मार्च २०१६ अखेर सर्व रक्कम वसूल होईल अशा रितीने समान मासिक हप्ते देण्यात यावेत.

सदर "कृषी संजीवनी योजना-२०१४" ही तात्पुरत्या व कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेल्या कृषी ग्राहकांना तसेच उपसा जलसिंचन योजनांना सुध्दा लागू राहिल.

ज्या कृषी ग्राहकाने योजनेत सहभाग घेतला नाही अथवा योजनेअंतर्गत ठरविण्यात आलेल्या रकमेचा भरणा केला नाही अशा कृषी ग्राहकांना योजनेकरीता अपात्र ठरविण्यात येईल व नियमाप्रमाणे व्याज व दंडासहीत पुर्ण रक्कम पुनःश्च ग्राहकाच्या खात्यात दर्शविली जाईल व विद्युत कायदा-२००३ नुसार थकबाकी वसुली करीता नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना विनंती आहे की, सदर मुदत वाढीबाबत जास्तीत जास्त कृषी ग्राहकांना अवगत करण्यात यावे. जेणेकरुन या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होईल.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**

\Waze\AE(B)\KSY\Comm Circular Krishi Sanjivani Marathi Extension- March २०१६ Convey.doc